नि.दि.दा. क्र. ६४/२०१९
करुणा व इतर वि. सखाराम व इतर
CNR No.MHWS080007482019

## निशाणी क्र. २० खालील आदेश

प्रतिवादी क्र. ०१ ने सदरचा अर्ज या प्रकरणात दिनांक १८.०२.२०२२ रोजी नि.क्र. १४ वर झालेल्या आदेशानुसार त्यास १००/– रुपये खर्च भरण्याची परवानगी मिळणेकरिता दाखल केला आहे. त्याच्या कथनानुसार, प्रस्तुत प्रकरण आजरोजी वि. न्यायालयामध्ये प्रलंबित असून दिनांक १८.०२.२०२२ रोजी नि.क्र. १४ वर प्रतिवादी क्र. ०१ विरुध्दचा लेखी जवाब आदेश रद्द पारीत करुन त्यास १००/– रुपये खर्च लावण्यात आला होता. आजरोजी प्रतिवादी क्र. ०१ हा सदर १००/– रुपये खर्च वादीला देण्यास तयार आहे. परंतु वादी व त्यांचे वकील ब–याच तारखांना हजर राहत नसल्याने प्रतिवादी क्र. ०१ ला १००/– रुपये खर्च भरण्याची परवानगी मिळण्याची विनंती केली.

**०२** याउलट वादीच्या वकीलांनी म्हणणे दाखल केले की, प्रतिवादीने दाखल केलेला अर्ज बेकायदेशीर असून चालण्याजोगा नाही. अगोदरच प्रतिवादी क्र. ०२ ने बराच उशीर केलेला आहे. अर्जदाराने न्यायालयाने पारीत केलेल्या आदेशाचे पालन केलेले नाही. अर्जदाराने आदेशाचे पालन आवश्यक त्या मुदतीत सुध्दा केले नाही. त्यामुळे अर्जदाराला सदर अर्ज करण्याचा अधिकार नाही. त्यामुळे सर्व परिस्थितीचा विचार करता प्रतिवादी क्र. ०१ चा अर्ज खर्चासह खारीज करण्याची विनंती केली.

**०३** दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने सदरचा दावा दिनांक १६.०७.२०१९ रोजी दाखल केला. तिन्ही प्रतिवादींना समन्स तामील झाले. प्रतिवादी क्र. ०१ ला संधी देऊनही त्याने जवाबदावा दाखल न केल्याने दिनांक २८.०१.२०२० रोजी माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी विनाजवाब आदेश प्रतिवादी क्र. ०१ विरुध्द पारीत केला. प्रतिवादी क्र. ०२ व ०३ हजर न झाल्याने त्यांच्याविरुध्द एकतर्फा आदेश पारीत झाला. त्यानंतर दिनांक २४.०२.२०२० रोजी नि.क्र. १४ खाली प्रतिवादी क्र. ०१ ने विना जवाब आदेश रद्द करण्याकरिता अर्ज दाखल केला होता. प्रतिवादी क्र. ०२ ने सुध्दा नि.क्र. १७ खाली एकतर्फा आदेश रद्द करण्याचा अर्ज दाखल केला होता.

**०४** वादीच्या वकीलांना वारंवार संधी देऊनही त्यांनी नि.क्र. १४ व १७ वर म्हणणे दाखल केले नव्हते. दिनांक १८.०२.२०२२ रोजी वादीच्या वकीलांनी दोन्ही अर्जावर म्हणणे दाखल केल्यावर त्याचदिवशी म्हणजेच दिनांक १८.०२.२०२२ रोजी नि.क्र. १४ वरील अर्ज १००/– रुपये खर्चासह आणि नि.क्र. १७ वरील अर्ज १००/– रुपये खर्चासह मंजूर करण्यात आला होता. अभिलेखावर प्रतिवादी क्र. ०१ आणि प्रतिवादी क्र. ०२ चा लेखी जवाब दाखल आहे, परंतु नि.क्र. १४ आणि नि.क्र. १७ वरील खर्चाची पुर्तता न केल्याने दिनांक २६.०४.२०२२ रोजी दोन्ही अर्जावरील आदेश दाखल दप्तरी करण्यात आले. त्यामुळे प्रतिवादींचे जवाबदावे अभिलेखावर घेण्यात आले नाही. त्यानंतर प्रतिवादी क्र. ०२ च्या वकीलांचा दिनांक ११.०७.२०२२ रोजीचा खर्चाची रक्कम भरण्यास वेळ मिळण्याचा नि.क्र. १९ वरील अर्ज नामंजूर करण्यात आला होता. त्यानंतर दिनांक १५.०३.२०२३ रोजी प्रतिवादी क्र. ०१ च्या वकीलांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**०५** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रकरणात २०२० साली जवाबदावा दाखल करण्याचा अर्ज दाखल होता. परंतु कोरोना कालावधीमुळे न्यायालय अंशतः स्वरुपात सुरु होते. त्यानंतर वादीच्या वकीलांचे म्हणणे आल्याबरोबर त्याच दिवशी नि.क्र. १४ वरील अर्जावर आदेश पारीत करण्यात आला होता. कोरोना कालावधीमुळे सहानुभुती दाखवून प्रतिवादी क्र. ०१ ला खर्चाची रक्कम लावण्यात आली होती. परंतु त्यानंतरही सदर रक्कमेची पुर्तता न केल्याने नि.क्र. १४ वरील आदेश दाखल दप्तरी करण्यात आला. सदर आदेश दाखल दप्तरी करुनही जवळपास एक वर्ष उलटल्यानंतर सदर अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ०१ चे वागणे संयुक्तीक नाही.

**०६** तसेच सदर अर्जामध्ये विलंबाचे कोणतेही संयुक्तीक कारण नमुद नाही. केवळ वादीचे वकील हजर राहत नाहीत, असे कथन केले आहे. परंतु वादीचे वकील गैरहजर असतांना प्रतिवादी क्र. ०१ ला नि.क्र. १४ वरील खर्चाची रक्कम न्यायालयात भरण्याची मुभा प्रत्येक तारखेला होती. परंतु प्रतिवादी क्र. ०१ किंवा त्याच्या वकीलांनी तशी तजवीज केलेली नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्याजोगा आहे. परंतु प्रतिवादी क्र. ०१ चा जवाबदावा अभिलेखावर अगोदरच दाखल असल्याने केवळ नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने प्रकरणाची सद्यस्थिती बघता सदर अर्जावर प्रतिवादी क्र. ०१

च्या लक्षात राहील असा खर्च लावून प्रतिवादी क्र. ०१ ला योग्य संधी देण्याच्या उद्देशाने व प्रकरण गुणदोषावर निकाली निघावे, याकरिता मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## **<u>आदेश</u>**

१. प्रतिवादी क्र. ०१ चा अर्ज १०००/– रुपये (एक हजार रुपये) खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. सदर अर्जाचा खर्च वादीला अदा केल्यानंतर नि.क्र. १४ वरील दाखल दप्तरी आदेश रद्द करुन प्रतिवादी क्र. ०१ चा जवाब दावा अभिलेखावर घेण्यात यावा.

Digitally signed by YOGESH DATTATRAY KOINKAR
Date: 2023.04.21 17:37:52 +0530

(योगेश द. कोईनकर)

दिनांकः २१.०४.२०२३ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, रिसोड

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Rohit D. Pandit (Stenographer L.G.) |
| Name of court | : | C.J.J.D.& JMFC;Risod |
| Date | : | 21.04.2023 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : | 21.04.2023 |
| Judgment/Order uploaded on | : | 21.04.2023 |